
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादकः मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। शुक्रवार, दि. २४ एप्रिल २०२६ । वर्ष १ । अंक १९ । पाने २।
DIGITAL EDITION



मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर दोन दिवस मेगाब्लॉक!

(पान २ वर)

## एनए जमिनीची प्रक्रिया आता होणार आणखी सोपी

Selected

**मुंबई** : राज्यात जमिनीच्या बिगरशेती वापरासाठी आवश्यक असलेल्या अकृषिक (एनए) रुपांतरण प्रक्रियेला आजपासून अधिक सुलभ आणि पारदर्शक बनवण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले. इमारत परवानगी व्यवस्थापन प्रणाली (बीपीएमएस) या ऑनलाइन प्रणालीमध्ये अकृषिक रुपांतरण अधिमूल्य भरण्याची सुविधा आजपासून उपलब्ध करून देण्यात आली. या नव्या सुविधेचे उद्घाटन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते मंत्रालयात करण्यात आले. यापूर्वी अनेक अडचणी येत होत्या. मात्र, आता या नव्या प्रणालीमुळेएका क्लिकवर ऑनलाईन पद्धतीने रूपांतरण अधिमूल्य भरता येणार असून, त्याची नोंद थेट ७/१२ उताऱ्यावर होणार आहे. व्यावसायिक प्रकल्पांचे बांधकाम करताना अकृषिक परवानगीसाठी अनेक महिने वाट पाहावी लागत होती.

## माजी जिल्हा परिषद सदस्य प्रताप पाटील यांच्या नावामुळे बदलते समीकरण; भाजपसमोर नवे आव्हान

# वाटाघाटींमध्ये विधान परिषदेची जागा शिंदे सेनेला?

## 'मैत्रीपूर्ण' लढतीची शक्यता, खर्चिक निवडणुकीने इच्छुक सावध

। जन सम्राट टाईम्स ।
मुकुंदराव नंन्नवरे

**जळगाव** : जळगाव जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषदेच्या रिक्त जागेसाठी महायुतीत चुरस वाढत असून, चालू वाटाघाटींमध्ये ही जागा शिंदे सेनेला जाण्याची दाट शक्यता व्यक्त होत आहे. भाजप आणि शिंदे सेनेने या जागेसाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केल्याने उमेदवारीवरून दोन्ही पक्षांमध्ये तणाव निर्माण झाला आहे. राजकीय सूत्रांच्या माहितीनुसार, परभणी आणि नाशिकमधील जागांच्या वाटाघाटीच्या पार्श्वभूमीवर जळगावची जागा शिंदे गटाला देण्याचा पर्याय गांभीर्याने विचारात घेतला जात आहे. परभणी मतदारसंघात भाजपचे वर्चस्व वाढल्याचे दिसत असताना, नाशिकमध्ये शहरी भागात भाजप तर ग्रामीण भागात शिंदे गटाची ताकद दिसून येते. या संतुलनाच्या राजकारणात जळगावची जागा शिंदे सेनेला मिळण्याची शक्यता बळावली आहे. जळगाव मतदारसंघात जवळपास १००० मते असून भाजप आणि शिंदे सेनेमध्ये ३० ते ३५ मतांचे अंतर असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे अंतिम वाटाघाटीत परभणी भाजपला आणि जळगाव शिंदे गटाला असा फॉर्म्युला निश्चित होण्याची चर्चा रंगली आहे. या पार्श्वभूमीवर



पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांचे सुपुत्र, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रताप पाटील यांचे नाव आघाडीवर आले आहे. मंत्री पाटील यांचे राज्यातील वरिष्ठ नेत्यांशी असलेले निकट संबंध आणि जिल्ह्यातील मजबूत जनसंपर्क यामुळे प्रताप पाटील यांच्या उमेदवारीला बळ मिळत असल्याचे मानले जात आहे. विशेष म्हणजे, प्रताप पाटील यांचे नाव पुढे आल्याने भाजपसमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. महायुतीत एकमताने उमेदवार देण्याचा प्रयत्न सुरू असला तरी जागा वाटपाचा तिढा न सुटल्यास 'मैत्रीपूर्ण' लढत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या निवडणुकीकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. गेल्या काही वर्षांत जळगावमध्ये शिंदे सेनेची ताकद लक्षणीयरीत्या वाढली आहे. संघटनात्मक मजबुती आणि जनसंपर्कामुळे पक्ष आक्रमक भूमिकेत आहे. कार्यकर्त्यांकडून प्रताप पाटील यांना उमेदवारी देण्याची मागणी जोर धरत आहे. सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग आणि सर्वसामान्यांशी असलेली जवळीक यामुळे त्यांची प्रतिमा बळकट झाली आहे. दुसरीकडे भाजपकडून उद्योजक नंदकुमार अडवाणी, माजी जि.प. सदस्य नंदकिशोर महाजन आणि अमोल शिंदे यांची नावे चर्चेत आहेत. जिल्ह्यातील मजबूत संघटना आणि मतदारसंघातील प्रभाव पाहता भाजपही ही जागा सहज सोडण्याच्या मनःस्थितीत नाही. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मतदारांची भूमिका या निवडणुकीत 'किंगमेकर' ठरू शकते, अशी चर्चा आहे. महाविकास आघाडीने अद्याप सावध भूमिका घेतली असून योग्य वेळी रणनीती जाहीर केली जाईल.

### महागडी निवडणूक; इच्छुकांमध्ये संभ्रम

विधान परिषदेची निवडणूक पारंपरिकरीत्या खर्चिक मानली जाते. २०१० मधील निवडणूक विशेष चर्चेत होती. यावेळीही थेट लढत झाल्यास खर्च वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे अनेक इच्छुक पुढे येण्यास उत्सुक असले तरी आर्थिक गणितामुळे सावध भूमिका घेत आहेत. जर भाजप आणि शिंदे सेनेमध्ये अंतिम युती फॉर्म्युला निश्चित झाला, तर महायुतीसाठी निवडणूक सोपी होऊ शकते. त्यामुळे अंतिम निर्णयानंतरच इच्छुकांची संख्या आणि राजकीय समीकरणे स्पष्ट होतील, असे जाणकारांचे मत आहे. एकूणच, जळगाव विधान परिषदेची ही निवडणूक महायुतीतील अंतर्गत राजकारण, संभाव्य 'मैत्रीपूर्ण' लढत आणि इतर पक्षांच्या भूमिकेमुळे अत्यंत रंगतदार ठरण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.


जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

## नव्या घरांचा हक्क रहिवाशांकडेच राहणार

### धारावीकरांसाठी मोठा दिलासा!

जन सम्राट टाईम्स

**जळगाव** : माटुंगा येथे रेल्वेच्या जागेवर उभारण्यात येणाऱ्या पुनर्वसन इमारतींमधील घरांवर धारावीकरांचाच पूर्ण मालकी हक्क राहणार असल्याची महत्त्वाची माहिती वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांनी दिली आहे. या प्रक्रियेत कोणतीही कायदेशीर अडचण नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत उभारल्या जाणाऱ्या इमारतींमध्ये स्थलांतरित होणाऱ्या रहिवाशांसाठी ही अत्यंत दिलासादायक बाब मानली जात आहे. घरांच्या मालकी हक्काबाबत सुरू असलेल्या चर्चांमुळे निर्माण झालेला संभ्रम आता दूर होण्याची शक्यता आहे.अधिकाऱ्यांच्या या स्पष्टिकरणामुळे प्रकल्पासंबंधी सुरू असलेल्या वादावर पडदा पडणार असून धारावीकरांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण होण्याची अपेक्षा आहे.धारावी पुनर्विकास प्रकल्पातील प्रत्यक्ष बांधकामाला लवकरच सुरुवात होणार असून, नव्या घरांचे स्वप्न आता प्रत्यक्षात उतरण्याच्या मार्गावर आहे. मात्र, प्रकल्पाला विरोध करणाऱ्या काही मोजक्या लोकांकडून अफवा पसरवून स्थानिकांमध्ये भीती आणि संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे दिसून येत आहे. 'नवी घरे रेल्वेच्या जागेवर उभारली जाणार असल्याने



धारावीकरांना त्या घरांवर मालकी हक्क मिळणार नाही' अशी अफवा मागील काही दिवसांपासून पसरवली जात होती. मात्र, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या दाव्यांचे स्पष्ट खंडन केले आहे.अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, माटुंगा परिसरातील सुमारे 45 एकर जागा रेल्वे प्राधिकरणाने धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी 99 वर्षांच्या भाडेकरारावर दिली आहे.

### कायदेशीर करार

यासंदर्भात रेल्वे लँड डेव्हलपमेंट अथॉरिटी (RLDA) आणि संबंधित प्राधिकरणांमध्ये कायदेशीर करार करण्यात आला आहे. या करारानुसार, संबंधित जमीन गृहनिर्माण संस्थांना सब-लीजवर देता येणार आहे. त्यामुळे जमीन रेल्वेच्या मालकीची असली तरी प्रकल्प राबवणारी संस्था प्राथमिक भाडेकरू (प्रायमरी लीज होल्डर) असेल, तर नव्याने स्थापन होणाऱ्या गृहनिर्माण संस्था या सब-लीज होल्डर असतील. यामुळे, पुनर्वसन इमारतींमध्ये मिळणाऱ्या घरांवर धारावीकरांचा हक्क अबाधित राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# रेल्वेस्थानकांतील स्तनपान केंद्रांची झाली कचराकुंडी!

जन सम्राट टाईम्स

**मुंबईः** मुंबईला काम करणाऱ्यांचे शहर म्हटले जाते. येथे प्रत्येक जण धावपळीत असून, कामाच्या व्यापातही अनेक स्तनदा माता आपल्या बाळांसह प्रवास करतात. अशा महिलांना स्थानकांवर बाळाला स्तनपान करणे पूर्वी मोठे आव्हान ठरत होते. या पार्श्वभूमीवर रेल्वे स्थानकांवर शिशु स्तनपान केंद्रांची सुविधा सुरू केली. मात्र, सध्या या केंद्रांची अवस्था चिंताजनक झाली असून अनेक ठिकाणी ती कचराकुंडीप्रमाणे वापरली जात असल्याचे, तसेच गुटखा खाऊन थुंकल्याने परिसर अस्वच्छ झाल्याचे दिसून येते. प्रवाशांची प्रचंड वर्दळ असलेल्या कुर्ला स्थानकावर या सुविधेची झालेली दुर्दशा हेच वास्तव अधोरेखित करते. कुर्ला स्थानक पश्चिमेकडील फलाट क्रमांक १ वरील तिकीट खिडकीजवळ असलेले स्तनपान केंद्र पूर्णपणे तुटलेल्या अवस्थेत असून, धुळीने माखलेले आहे.केंद्राच्या बाहेर कचरा साचला असून, दुर्गंधी पसरली आहे. परिणामी, या केंद्राचा वापर करणे तर दूरच, तिथे काही क्षण थांबणेही महिलांसाठी असुरक्षित आणि अस्वस्थ करणारे ठरत आहे. रेल्वे प्रशासनाने काही वर्षांपूर्वी महिलांच्या सोयीसाठी आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने ही स्तनपान केंद्रे सुरू केली. मात्र, प्रत्यक्षात त्यांच्या देखभालीकडे सातत्याने



दुर्लक्ष होत असल्याचे स्पष्ट दिसते. कुर्त्यांसारख्या महत्त्वाच्या आणि गर्दीच्या स्थानकावर अशी अवस्था असेल, तर इतर स्थानकांवरील परिस्थिती किती बिकट असेल, याची कल्पना करता येते. विशेष म्हणजे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'व्होकल फॉर लोकल' उपक्रमातर्गत उभारण्यात आलेले स्टॉल स्थानकावर ठळकपणे दिसतात. त्याची जाहिरातही मोठ्या प्रमाणात कैली जाते. मात्र, मातांसाठी अत्यावश्यक असलेल्या स्तनपान केंद्रांची माहिती देणारे फलक किंवा दिशादर्शक चिन्हे अनेक ठिकाणी आढळत नाहीत, त्यामुळे ही केंद्रे नेमकी कुठे आहेत, हेच अनेक महिलांना समजत नाही. कुर्ला स्थानकासोबतच मुंबईत दादर, डोंबिवली, कल्याण यांसारख्या प्रमुख स्थानकावरही ही केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. मात्र, तिथे देखील तुटलेली दारे, खिडक्या, बंद पाण्याची व्यवस्था, अंधारलेली खोली आणि असुरक्षित वातावरण यामुळे अनेक माता या केंद्रांकडे जाणे टाळत आहेत.त्यामुळे महिलाना सार्वजनिक ठिकाणीच लहान बाळांना स्तनपान करावे लागत असल्याने महिलांमध्ये मोठी नाराजी आहे.महिलांचे आरोग्य, सन्मान आणि सुरक्षिततेशी थेट संबंध असलेली ही सुविधा केवळ नावापुरती राहिल्याने प्रवासी आणि महिला संघटनांकडून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. संबंधित यंत्रणांनी या केंद्रांची तातडीने दुरुस्ती करून नियमित स्वच्छता, सुरक्षा आणि देखभाल सुनिश्चित करावी, तसेच स्पष्ट दिशादर्शक फलक लावावेत, अशी मागणी जोर धरत आहे. मुंबईच्या उपनगरी रेल्वे व्यवस्थेत महिलांसाठी मूलभूत सुविधा देण्याबाबत प्रशासन किती गंभीर आहे, हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.८८ लोकलमधील गदी इतकी वाढली आहे की घडधाकट माणसांनाही चढताना विचार करावा लागतो, अशा परिस्थितीत लहान बाळाला घेऊन आईने कसा प्रवास करावा, हा मोठा प्रश्न आहे. स्तनपानासाठी सुविधा उभारल्या असल्या, तरी त्यांची देखभाल होत नसल्याचे कुर्ला स्थानकावर स्पष्ट दिसते.

## मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर दोन दिवस मेगाब्लॉक!

जन सम्राट टाईम्स

**मुंबईः** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरून (एक्स्प्रेस वे) प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना देण्यात आली आहे. पुलाच्या दुरुस्ती व रंगकामाच्या कामासाठी 23 आणि 24 एप्रिल 2026 रोजी दुपारी 12 ते 3 या वेळेत प्रत्येकी तीन तासांचा मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. या कालावधीत संबंधित दिशेची वाहतूक पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC) कडून देण्यात आली आहे. MSRDC च्या माहितीनुसार, 23 एप्रिल रोजी दुपारी 12 ते 3 या वेळेत मुंबईकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद राहील. त्यानंतर 24 एप्रिल रोजी त्याच वेळेत पुण्याकडे येणारी वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. डोंगरगाव/कुसगाव (कि.मी. 58/500) येथील पुलावर दुरुस्ती व रंगकामाची कामे करण्यात येणार असल्याने हा मेगाब्लॉक आवश्यक ठरला आहे.मेगाब्लॉकदरम्यान प्रवाशांची गैरसोय कमी करण्यासाठी प्रशासनाकडून पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आले आहेत. देहूरोड आणि तळेगाव मार्गे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 48 वरून कुसगाव टोल प्लाझामार्गे वळवण्यात येणार आहे. तर 24 एप्रिल रोजी पुण्याकडे येणाऱ्या वाहनांना कुसगाव टोल प्लाझामार्गे राष्ट्रीय महामार्ग 48 वरून देहूरोड आणि किवळे मार्गे पुण्याकडे वळवण्यात येईल.या मेगाब्लॉकमुळे दुपारच्या वेळेत वाहतुकीवर ताण येण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाहनचालकांनी आपला प्रवास वेळेआधी नियोजित करावा, तसेच शक्य असल्यास पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## चऱ्होलीत भीमगीतांचा महासागर

### तथागत वेल्फेअर फाउंडेशनचा सांस्कृतिक सोहळा उत्साहात

। जन सम्राट टाईम्स ।
एस.एन. नांदेडकर

**पुणे** ; क्रांतिसूर्य ज्योतिराव फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त चऱ्होली (पुष्प चौथे) येथे भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तथागत वेल्फेअर फाउंडेशनच्या वतीने आयोजित या सोहळ्यात भीमगीतांचा अक्षरशः महासागर उसळला. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरल्या प्रसिद्ध भीमगीत गायिका Kadubai Kharat यांच्या दमदार सादरीकरणाने संपूर्ण परिसर भारावून गेला. त्यांच्या जोशपूर्ण गायनाने उपस्थितांमध्ये प्रचंड उत्साह निर्माण झाला असून भीमगीतांच्या माध्यमातून





समाजजागृतीचा प्रभावी संदेश देण्यात आला. या कार्यक्रमाला माजी महापौरांसह विद्यमान नगरसेवक नितीन अप्पा काळजे, सचिन भाऊ तापकीर, नगरसेविका सारिका ताई गायकवाड, रिपब्लिकन सेना महिला आघाडी पुणे अध्यक्षा सौ. गौरी ताई शेलार, नगरसेवक सागर भाऊ गवळी तसेच सामाजिक कार्यकर्ते महेश भाऊ तापकीर, विनोद गायकवाड, वंचित बहुजन आघाडीचे युवा अध्यक्ष सोनु भाऊ शेळके आदी मान्यवरांनी उपस्थिती लावली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सामाजिक कार्यकर्ते विजय मुंडे, फाउंडेशनचे अध्यक्ष रंगनाथ वाघमारे, खजिनदार सदानंद उदागे, सचिव राजू इंगळे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीचे अध्यक्ष धनराज मनोहर, खजिनदार समाधान ओव्हाळ, सचिव सचिन कांबळे यांनी मोलाचे योगदान दिले. तसेच तथागत वेल्फेअर फाउंडेशनचे अशोक गायकवाड, राजेश आखाडे, सोमनाथ कांबळे, प्रभाकर सूर्यवंशी, अजीत कांबळे, अरविंद केदारी यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. सप्तगड सोसायटीतील पदाधिकारी आणि स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांचेही सहकार्य लाभले. भीमगीतांच्या सुरांनी आणि समता-बंधुतेच्या संदेशांनी हा कार्यक्रम प्रेरणादायी वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

## शिवसेनेची सत्तेसाठी 'पॉवर ब्लूप्रिंट' जाहीर; 22 जिल्ह्यांची जबाबदारी 12 मंत्र्यांकडे

### निवडणुकांसाठी आक्रमक रणनीती; "जिंका, अन्यथा पर्याय नाही": नेतृत्वाचा स्पष्ट इशारा



जन सम्राट टाईम्स

**मुंबईः** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने सत्तेवर झेप घेण्यासाठी आक्रमक 'पॉवर ब्लूप्रिंट' जाहीर केली आहे. राज्यातील २२ जिल्हा परिषद व २२५ पंचायत समित्यांवर वर्चस्व मिळवण्याच्या उद्देशाने पक्षाने १२ प्रमुख मंत्र्यांच्या खांद्यावर २२ जिल्ह्यांची



जबाबदारी सोपवली आहे. शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'नंदनवन' या निवासस्थानी महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला खासदार श्रीकांत शिंदे, माजी आमदार आणि पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. पक्षाने यावेळी "जिंका, अन्यथा पर्याय नाही" असा स्पष्ट संदेश मंत्र्यांना देत निवडणूक तयारीत कोणतीही ढिलाई नको, असे निर्देश दिले आहेत. मागील निवडणुकीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या शिवसेनेने यावेळी राज्यात प्रथम क्रमांक मिळवण्याचा निर्धार केला आहे. प्रत्येक संपर्क मंत्र्याला दोन जिल्ह्यांची जबाबदारी देत निवडणूक व्यवस्थापन अधिक काटेकोर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### जिल्हानिहाय मंत्र्यांची जबाबदारी

गुलाबराव पाटील : जळगाव व नंदुरबार
उदय सामंत : नाशिक व अहमदनगर
योगेश कदम : ठाणे व पालघर
प्रकाश आबिटकर : नांदेड व हिंगोली
भरतशेठ गोगावले : बीड
आशिष जयस्वाल : जालना
प्रताप सरनाईक : अमरावती व अकोला
संजय राठोड : यवतमाळ व वाशिम
संजय शिरसाट : भंडारा व गोंदिया
प्रतापराव जाधव : नागपूर व वर्धा
शंभुराज देसाई : गडचिरोली व चंद्रपूर
दादा भुसे : धुळे व बुलढाणा

## पाळधीतील अधिकाऱ्यांच्या बदल्या; कंडारे यांच्यासह तिघांचे स्थानांतर

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव** : धरणगाव तालुक्यातील पाळधी पोलीस चौकीतील सहाय्यक पोलीस निरीक्षक (स.पो.नि.) प्रशांत कंडारे यांच्यासह दोन अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय कामकाजासाठी बदल्या करण्यात आल्या आहेत. पोलीस अधीक्षक यांनी काढलेल्या आदेशानुसार पाळधी पोलीस चौकीचे स.पो.नि. प्रशांत कंडारे यांची पोलीस अधीक्षक कार्यालयात वाचक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयात वाचक म्हणून कार्यरत असलेले निलेश राजपूत यांची रामानंद नगर पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. तर रामानंद नगर पोलीस ठाण्यातील स.पो.नि. भुषण कोते यांची पाळधी पोलीस चौकी येथे बदली करण्यात आली आहे. सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी नव्या ठिकाणी तात्काळ हजर होऊन पदभार स्वीकारावा, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.



### यांची केली बदली

पोलीस अधीक्षक कार्यालयात वाचक म्हणून कार्यरत असलेले निलेश राजपूत यांची रामानंद नगर पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. तर रामानंद नगर पोलीस ठाण्यातील स.पो.नि. भुषण कोते यांची पाळधी पोलीस चौकी येथे बदली करण्यात आली आहे.

Selected

## वाढत्या उष्णतेचा पोल्ट्री व्यवसायाला फटका

**देहूगाव :** मावळ व खेड तालुक्यातील वाढत्या उष्णतेमुळे कुक्कुटपालन व्यवसाय गंभीर संकटात सापडला आहे. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीपासूनच तापमानात झालेल्या तीव्र वाढीचा थेट परिणाम पोल्ट्री फार्ममधील कोंबड्यांवर होत असून, उष्माघातामुळे त्यांच्या मृत्यूचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे पोल्ट्री व्यावसायिकांना मोठ्या आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागत आहे. मावळ तालुक्यातील सुदुंबरे, जांबवडे, जाधववाडी तसेच खेड तालुक्यातील निघोजे, भांबोली, शिंदेवासुली, मरकळ, गोळेगाव, चरोली या परिसरात मोठ्या प्रमाणात पोल्ट्री व्यवसाय चालतो.

मात्र, यंदा उन्हाची तीव्रता लवकर वाढल्याने कोंबड्यांवर उष्णतेचा ताण निर्माण झाला आहे. परिणामी, कोंबड्यांचे मृत्यू वाढले असून, जिवंत कोंबड्यांचे वजनही घटत आहे.उष्णतेपासून संरक्षणासाठी व्यावसायिकांकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. शेडवर उसाचे पाचट टाकणे, त्यावर पाणी मारणे, स्प्रिंकलर व फॉगर प्रणालीचा वापर, फॅन बसवणे, पत्र्याच्या शेडला बारदान पोती लावणे अशा उपायांनी तापमान कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र, या उपाययोजनांमुळे खर्चात मोठी वाढ होत असून, अपेक्षित परिणाम मिळत नसल्याची खंत व्यावसायिकांनी व्यक्त केली आहे. सध्या परिसरात प्रखर उष्णतेची लाट कायम असून, उष्माघातामुळे कोंबड्यांचे मोठ्या प्रमाणात मृत्यू होत आहेत.


# शिवसेनेत 'मराठी' मुद्द्यावरून जुंपली!

## निरुपमांचा सक्तीला विरोध,सरनाईकांना पत्र लिहून नाराजी

जन सम्राट टाईम्स

**मुंबई :** 'महायुती' सरकारमध्ये मराठी भाषेच्या सक्तीच्या वापरावरून एक मोठा अंतर्गत वाद उफाळून आला आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी १ मे (महाराष्ट्र दिन) पासून लागू केलेला एक निर्णय ज्यानुसार रिक्षा, टॅक्सी, ओला आणि उबर चालकांसाठी मराठी बोलणे आणि मराठी भाषेची प्राविण्य चाचणी उत्तीर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्या निर्णयाला त्यांच्याच पक्षातील नेते संजय निरुपम यांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. तसेच, मराठी सक्तीवर फेरविचार करावा असं पत्र परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना पाठवलं आहे. धोरणात्मक मतभेदांमुळे निर्माण झालेल्या या परिस्थितीने सरकारमध्येच एका प्रकारच्या अंतर्गत 'सत्तासंघर्षाचे' स्वरूप धारण केले आहे.परिवहन विभागाच्या नवीन नियमांनुसार, कोणत्याही नवीन परवान्यासाठी (लायसन्स) किंवा बॅजसाठी अर्ज करणाऱ्या चालकांना आता मराठी भाषेची प्राविण्य चाचणी देणे अनिवार्य असेल. या परीक्षेत अनुत्तीर्ण होणाऱ्या चालकांचे परवाने रद्द होण्याचा धोका निर्माण झाला आहे. या निर्णयाच्या निषेधार्थ, राज्यभरातील सुमारे १५ लाख रिक्षा आणि टॅक्सी चालकांनी ४ मे पासून बेमुदत संपावर जाण्याची घोषणा केली आहे.शिवसेना नेते आणि माजी खासदार संजय निरुपम यांनी या निर्णयाला "अन्यायकारक" संबोधले असून, यामुळे चालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे म्हटले आहे. निरुपम यांनी असा युक्तिवाद केला की, "प्रवाशांशी संवाद साधण्यासाठी चालकांना मराठीचे किमान ज्ञान असावे, अशी अपेक्षा करणे रास्त आहे; परंतु त्यांनी मराठी वाचता-लिहिता यावे आणि भाषेवर संपूर्ण प्रभुत्व असल्याचे सिद्ध करावे, अशी अपेक्षा करणे मात्र अन्यायकारक आहे. जर सरकारने हा निर्णय मागे घेतला नाही, तर आम्ही आमच्याच सरकारविरोधात रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यास भाग पडू." त्यांनी या संदर्भात मंत्री सरनाईक यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करण्याचा मानसही व्यक्त केला.प्रख्यात वकील गुणरत्न सदावर्ते यांनीही या निर्णयाला 'असंवैधानिक' (राज्यघटनेच्या विरोधात) ठरवले आहे. त्यांनी निदर्शनास आणून दिले की, १ मे हा 'कामगार दिन' (May Day) असतो; आणि याच दिवशी कामगार वर्गामध्ये या विशिष्ट प्रकरणात, चालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणे हे बेकायदेशीर आहे. सदावर्ते यांच्या मते, भाषा हे केवळ संवादाचे माध्यम असते; तिचा वापर दडपशाहीचे साधन म्हणून करणे हे राज्यघटनेत अंतर्भूत असलेल्या मूलभूत तत्त्वांच्या पूर्णपणे विरोधात आहे. त्यांनी ठामपणे सांगितले की, भाषेच्या मुद्द्यावरून कोणत्याही नागरिकाला प्रशासकीय छळ किंवा सतावणुकीला सामोरे जाऊ दिले जाणार नाही.दुसरीकडे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक हे आपल्या निर्णयावर ठाम असल्याचे दिसून येत आहे.

मराठी न बोलणाऱ्या चालकांना मराठी शिकवण्यासाठी एक विशेष अभ्यासक्रम सुरू करण्याची सरकारची योजना आहे. मात्र, 'मुंबई ऑटोरिक्षा मेन्स युनियन'सारख्या प्रमुख संघटनांनी पुकारलेल्या संपाच्या घोषणेमुळे सरकारच्या अडचणींमध्ये आणखीच भर पडली आहे. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे हा अंतर्गत वाद आणि संपाचे हे संभाव्य संकट कशा प्रकारे सोडवतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.'महायुती' सरकारमध्ये मराठी भाषेच्या सक्तीच्या वापरावरून एक मोठा अंतर्गत वाद उफाळून आला आहे.





### मराठी भाषेची प्राविण्य चाचणी अनिवार्य

१ मे (महाराष्ट्र दिन) पासून लागू केलेला एक निर्णय ज्यानुसार रिक्षा, टॅक्सी, ओला आणि उबर चालकांसाठी मराठी बोलणे आणि मराठी भाषेची प्राविण्य चाचणी उत्तीर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्या निर्णयाला त्यांच्याच पक्षातील नेते संजय निरुपम यांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. तसेच, मराठी सक्तीवर फेरविचार करावा असं पत्र परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना पाठवलं आहे या परिस्थितीने सरकारमध्येच एका प्रकारच्या अंतर्गत 'सत्तासंघर्षाचे' स्वरूप धारण केले आहे.परिवहन विभागाच्या नवीन नियमांनुसार, कोणत्याही नवीन परवान्यासाठी (लायसन्स) किंवा बॅजसाठी अर्ज करणाऱ्या चालकांना आता मराठी भाषेची प्राविण्य चाचणी देणे अनिवार्य असेल.

### चालकांना मराठीचे ज्ञान असावे

या परीक्षेत अनुत्तीर्ण होणाऱ्या चालकांचे परवाने रद्द होण्याचा धोका निर्माण झाला आहे. या निर्णयाच्या निषेधार्थ, राज्यभरातील सुमारे १५ लाख रिक्षा आणि टॅक्सी चालकांनी ४ मे पासून बेमुदत संपावर जाण्याची घोषणा केली आहे.शिवसेना नेते आणि माजी खासदार संजय निरुपम यांनी या निर्णयाला "अन्यायकारक" संबोधले असून, यामुळे चालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे म्हटले आहे. निरुपम यांनी असा युक्तिवाद केला की, "प्रवाशांशी संवाद साधण्यासाठी चालकांना मराठीचे किमान ज्ञान असावे, अशी अपेक्षा करणे रास्त आहे; परंतु त्यांनी मराठी वाचता-लिहिता यावे आणि भाषेवर संपूर्ण प्रभुत्व असल्याचे सिद्ध करावे, सरकारने हा निर्णय मागे घेतला नाही, तर आम्ही आमच्याच सरकारविरोधात रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यास भाग पडू." त्यांनी या संदर्भात मंत्री सरनाईक यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करण्याचा मानसही व्यक्त केला. प्रख्यात वकील गुणरत्न सदावर्ते यांनीही या निर्णयाला 'असंवैधानिक' (राज्यघटनेच्या विरोधात) ठरवले आहे.

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

## जातीनिहाय जनगणनेसाठी 'भारत बंद'ला प्रतिसाद!

### तीन प्रमुख मागण्यांवर देशव्यापी बंद यशस्वी

। जन सम्राट टाईम्स ।
जगदीश सपकाळे

**जळगाव:** ओबीसींच्या जातीनिहाय जनगणनेच्या मागणीसाठी भारत मुक्ती मोर्चा आणि राष्ट्रीय पिछडा वर्ग मोर्चाच्या वतीने पुकारण्यात आलेल्या 'भारत बंद'ला जळगाव जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यात विविध ठिकाणी आंदोलन करण्यात आले असून शहरातील प्रमुख चौकांमध्ये चक्का जाम केल्याने काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. या आंदोलनामागे तीन प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या. ओबीसी वर्गाची जातीनिहाय जनगणना करावी, उच्च शिक्षण क्षेत्रात एससी, एसटी व ओबीसी विद्यार्थ्यांवरील भेदभाव रोखण्यासाठी कडक युजीसी इक्विटी रेग्युलेशन लागू करावे आणि २०११ पूर्वी नियुक्त शिक्षकांना टीईटीमधून सूट द्यावी, या मागण्यांवर आंदोलन करण्यात आले. भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम आणि राष्ट्रीय पिछडा वर्ग मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष चौधरी विकास पटेल यांच्या नेतृत्वाखाली देशभर टप्प्याटप्प्याने आंदोलन राबवले जात असून त्याचा चौथा टप्पा म्हणून हा 'भारत बंद' पुकारण्यात आला होता. जळगाव जिल्ह्यात २० ठिकाणी आंदोलन करण्यात आले. जिल्हाध्यक्ष देवानंद निकम आणि ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सुभाष नावडे पाटील यांच्या नेतृत्वाखाली



बंद पार पडला. शहरात टॉवर चौक, चित्रा चौक, दाणा बाजार, घाणेकर चौक, नेहरू चौक, कोर्ट चौक या ठिकाणी शेकडो आंदोलकांनी चक्का जाम केल्याने वाहतुकीवर परिणाम झाला. या बंदला राष्ट्रीय सेन संघ, मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, आदिवासी टोकरे कोळी महासंघ, राष्ट्रीय आदिवासी एकता परिषद, बहुजन क्रांती मोर्चा, बहुजन मुक्ती पार्टी यांसह विविध सामाजिक संघटनांचा सक्रिय सहभाग लाभला.

### तीन प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या

जळगाव जिल्ह्यासह देशातील ७२५ जिल्हे आणि ३१ राज्यांमध्ये हा 'भारत बंद' यशस्वीपणे पार पडल्याचा दावा आंदोलनकर्त्यांकडून करण्यात आला आहे.जिल्ह्यात विविध ठिकाणी आंदोलन करण्यात आले असून शहरातील प्रमुख चौकांमध्ये चक्का जाम केल्याने काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. या आंदोलनामागे तीन प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

## भाजप पदाधिकारी वडिलांसह जीवघेण्या हल्ल्यात जखमी

### ६ आरोपी अटकेत, नेवाळीत धिंड

जन सम्राट टाईम्स

**पुणे :** कल्याण परिसरात दुकानदारांना होणाऱ्या त्रासाला विरोध केल्याच्या कारणावरून भाजप पदाधिकारी विशाल जाधव आणि त्यांच्या वडिलांवर जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या हल्ल्यात दोघेही गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, परिसरातील काही गावगुंडांकडून दुकानदारांकडून जबरदस्तीने हप्तेवसुली, नागरिकांना त्रास देणे व मारहाण करण्याचे प्रकार सुरू होते. या गैरप्रकारांना विशाल जाधव यांनी विरोध केल्याने आरोपींनी संतापातून त्यांच्यावर आणि त्यांच्या वडिलांवर हल्ला केला. घटनेनंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत ६ आरोपींना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्यांमध्ये गवती यादव, हृषिकेश पवार, सुरेश चौधरी, रोहन बचूते, नितीन चौधरी आणि रवींद्र वाव्हळ यांचा समावेश आहे. अटकेनंतर पोलिसांनी या आरोपींची नेवाळी भागात धिंड काढत कडक संदेश दिला. दरम्यान, या प्रकरणातील मुख्य आरोपी भावेश भोईर आणि हृषिकेश हे फरार असून त्यांचा शोध घेण्यासाठी हिललाइन पोलिसांची दोन पथके रवाना करण्यात आली



आहेत. परिसरात भावेश भोईर या सराईत गुन्हेगाराची दहशत असून त्याने टोळी तयार केल्याची माहिती समोर आली आहे.

### हल्ल्यात दोघेही गंभीर

या घटनेनंतर स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून सर्व आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. या हल्ल्यात दोघेही गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. माहितीनुसार, परिसरातील काही गावगुंडांकडून दुकानदारांकडून जबरदस्तीने हप्तेवसुली, नागरिकांना त्रास देणे व मारहाण करण्याचे प्रकार सुरू होते. या गैरप्रकारांना विशाल जाधव यांनी विरोध केल्याने आरोपींनी संतापातून त्यांच्यावर आणि त्यांच्या वडिलांवर हल्ला केला.

# कल्याण-डोंबिवलीत नालेसफाईला सुरुवात; गटारांचा प्रश्न कायम

## 'अ' प्रभागात साफसफाईला गती, पण जीर्ण नाले-गटारांमुळे नागरिकांमध्ये भीती

। जन सम्राट टाईम्स ।
संदीप शेंडगे

कल्याण: कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या 'अ' प्रभाग क्षेत्रात पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नालेसफाईच्या कामांना सुरुवात करण्यात आली आहे. मात्र, परिसरातील तुटलेले, मोडकळीस आलेले आणि तुंबलेले नाले व गटारे यामुळे नागरिकांमध्ये तीव्र चिंता व्यक्त होत आहे. महानगरपालिकेच्या २०१५ नंतर अपेक्षित असलेल्या २०२० च्या निवडणुका कोरोनामुळे न झाल्याने २०२० ते २०२६ या कालावधीत प्रशासकीय राजवट राहिली. या काळात अनेक विकासकामे अर्धवट राहिल्याचे चित्र दिसून येत





आहे. नगरसेवक निधी उपलब्ध नसल्याने विशेषतः गटारे व नाल्यांच्या बांधकामांमध्ये मोठ्या त्रुटी राहिल्या असून अनेक कामे अपूर्ण किंवा सुरूच झाली नाहीत. अटाळी, आंबिवली, वडवली, मोहने, पंचशील नगर, जेतवन नगर, महात्मा फुले नगर, उंभर्णी, बल्यानी, टिटवाळा आदी भागांमध्ये नाले व गटारांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. अनेक ठिकाणी गटारे पूर्णपणे तुटलेली असून पावसाळ्यात पावसाचे पाणी थेट घरात घुसण्याचा धोका निर्माण झाला आहे.

विशेषतः बल्यानी परिसरात दरवर्षी गटाराचे पाणी घरात शिरून नुकसान होत असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. सध्या नालेसफाईची कामे सुरू असली तरी तुटलेल्या गटारांचे काय, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. केवळ साफसफाई करून समस्या सुटणार नसून, जीर्ण गटारांची तातडीने दुरुस्ती किंवा नव्याने बांधकाम करणे अत्यावश्यक असल्याचे मत स्थानिकांनी व्यक्त केले आहे.


### यंत्रणा सक्षम करणे गरजेचे

नागरिकांच्या आरोग्याचा विचार करता तसेच पावसाळ्यात होणारे नुकसान टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने निधी मंजूर करून जलनिस्सारण व्यवस्थेची दुरुस्ती हाती घ्यावी, अशी जोरदार मागणी होत आहे. पावसाळा जवळ येत असताना केवळ नालेसफाईवर मर्यादित न राहता संपूर्ण जलनिस्सारण यंत्रणा सक्षम करणे गरजेचे असल्याचे स्पष्ट होत आहे.

## कल्याण स्टेशनवर प्रशासनाचा निष्काळजीपणा!

जन सम्राट टाईम्स

**कल्याण :** कल्याण रेल्वे स्थानकावर माणुसकीला काळिमा फासणारी आणि रेल्वे प्रशासनाचा निर्ढावलेपणा उघड करणारी संतापजनक घटना घडली आहे. वृद्ध महिलेचा जीव वाचवण्यासाठी मूलभूत सुविधा नसल्याचे समोर आले असून, प्रवाशांच्या आक्रोशानंतरही तासभर कोणतीही मदत न मिळाल्याने अखेर त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. सुनंदा दंडवते यांचा दुर्दैवी अंत पुण्यातील सुनंदा दंडवते या वयोवृद्ध महिला उपचारासाठी कल्याणमध्ये आल्या होत्या. उपचारानंतर पुण्याकडे जाण्यासाठी त्या स्थानकावर थांबल्या असताना त्यांना अचानक फिट आली आणि त्या बेशुद्ध होऊन पडल्या. उपस्थित प्रवाशांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली, मात्र याच क्षणापासून प्रशासनाच्या हलगर्जीपणाचा प्रकार समोर आला. तासभर मदतीसाठी याचना प्रवाशांनी आरपीएफ, जीआरपी आणि स्टेशन प्रशासनाकडे



धाव घेतली, मात्र तब्बल एक तास कोणताही कर्मचारी किंवा पोलीस मदतीसाठी घटनास्थळी पोहोचला नाही. इतकेच नव्हे तर, इतक्या मोठ्या स्थानकावर एका वृद्ध महिलेला नेण्यासाठी साधा स्ट्रेचरदेखील उपलब्ध नसल्याने प्रवाशांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. साडीची झोळी करून धाव वेळ निघून जात असल्याचे पाहून रोहित दंडवते आणि आर्यन हुले या दोन तरुणांनी पुढाकार घेत महिलेच्या बॅगेतील साडीचा उपयोग करून झोळी तयार केली. त्या झोळीत महिलेला झोपवून प्लॅटफॉर्म क्रमांक ७ वरून प्लॅटफॉर्म क्रमांक १ पर्यंत आणत बाहेर नेण्यात आले. या प्रकारामुळे रेल्वे प्रशासनाची गंभीर बेपर्वाई उघड झाली आहे.

## 'जागतिक पुस्तक दिना'निमित्त ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन!

### वाचन संस्कृती जपण्याचे आवाहन




जन सम्राट टाईम्स

नशिराबाद: येथील सार्वजनिक वाचनालयात 'जागतिक पुस्तक दिना'चे औचित्य साधत नूतन खरेदी केलेल्या ग्रंथांच्या प्रदर्शनाचे उत्साहात उद्घाटन करण्यात आले. वाचकांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि नवीन साहित्याची ओळख व्हावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन नशिराबाद नगरपरिषदेचे वित्त व नियोजन सभापती आदरणीय मनोज चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते ग्रंथपूजन करून करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर वाचनालयाचे कार्याध्यक्ष जनार्दन शामराव माळी, सेक्रेटरी ॲड. प्रदीप मुरारी देशपांडे, तसेच संचालक मिठाराम शामराव म्हसकर, राजेश्वर सखाराम धर्माधिकारी, जितेंद्र देविदास पाटील, मनोज अरुण नाईक आणि बंडू रूपचंद खंडारे उपस्थित होते. उद्घाटन प्रसंगी बोलताना मनोज पाटील यांनी वाचन संस्कृतीचे महत्त्व अधोरेखित करत, "पुस्तके ही माणसाची खरी मित्र आहेत. डिजिटल युगातही ग्रंथांचे महत्त्व कमी झालेले नाही," असे मत व्यक्त केले. वाचनालयाने खरेदी केलेल्या विविध विषयांवरील नव्या पुस्तकांमुळे अभ्यासक आणि रसिक वाचकांना ज्ञानाची नवी दालने खुली होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला ज्येष्ठ वाचक प्रा. व्ही. बी. कोष्टी, दगडू दत्तात्रय माळी, अशोक महादेव धोत्रे, सुनील सुकलाल शिवरामे, विजय कृष्णाजी तिडके यांच्यासह मोठ्या संख्येने वाचक सभासद आणि पुस्तकप्रेमी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रंथपाल सौ. अनुराधा पंकज तारकस आणि शिपाई सुधाकर बाबुराव महाजन यांनी विशेष परिश्रम घेतले. या ग्रंथ प्रदर्शनाला नशिराबादमधील वाचकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

## प्रसिद्ध उद्योजक प्रदीप पवार यांना 'महाराष्ट्र जनकल्याण उद्योग भूषण' पुरस्कार

### मेहनत, प्रामाणिकपणा आणि दूरदृष्टीच्या जोरावर उद्योग क्षेत्रात ठसा

जन सम्राट टाईम्स

**पुणे (हडपसर) :** हडपसर येथील उद्योग क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करून अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारे उद्योजक प्रदीप पवार यांना 'महाराष्ट्र जनकल्याण उद्योग भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हडपसर येथील स्व. खासदार विठ्ठलराव तुपे पाटील नाट्यगृहात आयोजित कार्यक्रमात विद्याभूषण डॉ. प्रशांत पगारे यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. प्रदीप पवार यांनी मेहनत, प्रामाणिकपणा आणि दूरदृष्टीच्या बळावर उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले असून, अनेक तरुणांना रोजगार उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस पुणे शहर उपाध्यक्ष सुरेश आण्णा घुले, डॉ. दत्ता कोहिनूर, अमोल नाना तुपे, पितांबर धिवार, गोरक्ष गायकवाड, महेश इंगळे, हरिदास भिसे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन जनकल्याण युवा विचार मंच आणि 'आपली चळवळ' यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

